पीपल्स एज्युकेशन सोसायटी (मुंबई) चे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय,
नागसेनवन, औरंगाबाद
आणि
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
अनुदान आयोग
यांच्या संयुक्त विद्यमाने

एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

दलित, बहुजन व अल्पसंख्यांक स्त्रींची सद्यस्थितीतील दशा व दिशा

मराठी - २

Editor
Principal
Dr. Kishor Salve



AJANTA
PRAKASHAN

अणुक्रमाणिका मराठी भाग - २

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
३८	औरंगाबाद जिल्ह्यात महाराष्ट्र शासनामार्फत मूलीच्या माध्यमिक शिक्षणासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांचा चिकित्सक अभ्यास **ज्वाला रगडे** **डॉ. प्रशांत बी. पगारे**	१२३-१२६
३९	बुद्धकालीन स्त्रीयांची सामाजिक स्थिती **पाडमुख भाग्यशाली रामदास**	१२७-१२९
४०	भारतीय महिला बॅड मिंटनपटू : पुसरला व्यंकटा सिंधू **डॉ. प्रफुल्ल प्रकाश वराळे** **गौतम सांडूलाल गायकवाड**	१३०-१३१
४१	भारतीय महिला परिवर्तनाची सद्यस्थिती आणि पुरुष प्रधान संस्कृतिची मानसिकता **डॉ. आर. व्ही. मस्के**	१३२-१३३
४२	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार आणि स्त्रिमुक्ती **धनराज ना. गोंडाणे**	१३४-१३७
४३	सक्षम महिला प्रगत समाज **संघरत्न शिवाजी गवई** **डॉ. पी. एम. कल्याणकर**	१३८-१३९
४४	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक कार्य **प्रा. विद्या खंडारे - गोवंदे**	१४०-१४३
४५	बौद्ध धम्माने रचला स्त्रि स्वातंत्र्याचा पाया **डॉ. कुनाली केशव बोदेले**	१४४-१५०
४६	महिला सबलीकरण व महिला बचतगट **प्रा. राणी जगन्नाथराव जाधव**	१५१-१५४
४७	महिला सक्षमिकरण **प्रा. चाटसे अशोक जयाजी**	१५५-१५८

४२

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार आणि स्त्रिमुक्ती

धनराज ना. गोंडाणे
पाली आणि बुद्धिझम विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबद.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध विचार पैलूंवर अनेक अभ्यासकांनी मांडणी केलेली आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक विचार पैलूंवर स्वतंत्रपणे विपूल असे लेखन व अध्ययन झाले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण विचार व लढ्यात स्त्री सहभाग व विकासाबाबत अत्यंत मुलगामी चिंतन व लेखन केले आहे. त्यांच्या सामाजिक समतेच्या लढ्यातूनही हे स्पष्ट जाणवते. स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून समतामूलक संवैधानिक अधिकार प्रदान करुन समाजात आत्मसन्मान व स्वाभिमानाने उभे राहण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून जे कार्य केले आहे, त्याचेच फलित म्हणून आज समाजातील विविध क्षेत्रात स्त्रियां आपली स्वतंत्र ओळख, अस्तित्व निर्माण करु शकल्या आहेत.

हिंदू समाजातील सगळया प्रकारच्या विषमतेपैकी एक म्हणजे स्त्री-पुरुष समानता. तिच्यामुळे स्त्रियावर होणारे अन्याय दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका हाती कायद्याचे क्षेत्र व दुसऱ्या हाती चळवळीचे शस्त्र वापरले असल्याचे त्यांच्या समग्र कार्यातून दिसून येते. भारतीय समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विद्यार्थी दशेपासूनच स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. आपल्या वडीलांच्या मित्राला ४ ऑगस्ट, १९१३ रोजी न्युयॉर्क वरुन पाठविलेल्या पत्रातून डॉ.बाबासाहेबांचा स्त्रीशिक्षणाबद्दलचा उदातत दृष्टीकोन दिसून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९२४ साली स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेचे सभासद होण्याचा पुरुषाप्रमाणेच स्त्रियांनाही अधिकार देण्यात आला होता. ब्राह्मणी धर्मग्रंथांनी लादलेल्या मानसीक गुलामगिरीतून स्त्रियांना मुक्त करण्याच्या हेतूने २५ डिसेंबर, १९२७ साली मनुस्मृतीचे दहन केले. सन १९२७ साली स्थापन केलेल्या 'समाज समता संघाच्या' ध्येय धोरणातच स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केलेला दिसतो. सन १९२७ सालच्या महाड सत्याग्रहात स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभागी झालेल्या दिसतात. २८ जुलै, १९२८ रोजी डॉ. आंबेडकरांनी महिला कामगारांना बाळंतपणाची भरपगारी रजा मिळाली पाहिजे. त्यांचे असे मत होते की, माता आणि बाळाच्या स्वस्थ राहण्यामध्येही राष्ट्राचे हित आहे.

सन १९२९ पुणे येथील पर्वती मंदिर सत्याग्रह, २ मार्च १९३० ते ३४ काळाराम मंदिर नासीक सत्याग्रहात स्त्रियांचा सहभाग, सन १९३७ व ३८ मध्ये देवदासी, मुरळीप्रथा व वेश्याव्यवसाय विरोधात केलेल्या भाषणावरुन त्यांना स्त्री अत्याचाराविरुध्द चीड असल्याचे दिसते व त्यांनी त्यावेळी स्त्रियांना नैतीक मुल्य जोपासण्याचा संदेश दिलेला दिसतो.

परंपरागत कायद्याने जखडलेल्या स्त्रीला डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून समानतेच्या आधारावर समानसंधी उपलब्ध करुन दिली. राज्यघटनेतील समता, स्वातंत्र्य न्याय हि तत्वे स्त्री स्वातंत्र्य व स्त्रीमुक्तीसाठी महत्वाची ठरण्याचे ठरण्याचे दिसते. स्त्रियांना आर्थिक, सामाजिक व धार्मीक स्वायतत्ता मिळवून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९४८ साली हिंदू कोड बील संसदेत सादर केले. १४ ऑक्टोंबर, १९५६ साली डॉ. आंबेडकरांनी केलेल्या धर्मांतरामुळे स्त्रियांमध्ये आमुलाग्र मानसीक, सामाजिक, वैचारीक परिवर्तन घडून आलेले दिसते. त्यांचा बौध्द धम्म स्वीकारण्यामागील इतर उद्देशाप्रमाणे स्त्रीमुक्ती हाही प्रमुख उद्देश दिसतो.

यावरुन डॉ. आंबेडकरांनी सामाजिक समतेच्या आंदोलनाला स्त्रीमुक्तीला प्राधान्य दिलेले दिसते. त्यातही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रियांनी शिक्षण घेऊन स्वावलंबी व स्वाभिमानी बदले पाहिजे. असा विश्वास सातत्याने त्यांच्या कृती कार्यक्रमातून भाषणे, लेखन व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक तत्वज्ञानातून स्पष्ट होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रिमुक्तीविषयक कार्य हे केवळ उपेक्षित, वंचित घटकातील स्त्रियांपुरतेच मर्यादित नव्हते तर देशातील सर्व स्त्रिवर्गाच्या उध्दाराचे कार्यव्रत त्यांनी घेतले होते. जाती, वर्गविरहीत स्त्रिवर्गाचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी त्यांनी वेळोवेळी आपल्या लिखाणातून, भाषणातून व चळवळीतून विचार मांडलेले आहेत. एकूणच भारतीय समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या आयुष्यात विद्यार्थी दशेपासूनच स्त्रिस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. कोलंबिया विद्यापिठात उच्च शिक्षण घेत असतांना आपल्या वडीलांचे स्नेही सुभेदार शिवनाक जमेदार यांना न्युयॉर्क वरुन ४ ऑगस्ट १९१३ रोजी पाठविलेल्या पत्रातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्रिस्वातंत्र्य व स्त्रिशिक्षणाबद्दलचा उदात्त दृष्टीकोन स्पष्ट होतो.

या पत्रात जमेदारांना ते लिहितात, 'We must how entirely give up the idia that parents give" Janma to the child and not" "Karma" They can mould the destiny of their children and if we but follow this principle be sure that we shall soon see batter day and our progress will be greathly accelerated if male education is persued side by side with female education the fruit of which you can very well see verified your own daughter"[1]

अर्थात, आई-बाप आपल्या मुलाला जन्म देतात, कर्म देत नाही, असे त्यांचे म्हणणे ठिक नाही. आई-बाप मुलांच्या आयुष्यात वळण लावू शकतात. ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलीच्याही शिक्षणासाठी धडपड केली, तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल.[२]

पुढे त्यांनी म्हटलं होतं. दिन दलितांचं दैन्य संपविणारा एकमेव मार्ग म्हणजे त्यांच शिक्षण होय. कार्यकर्त्यांनी शिक्षण प्रसारासाठी झटले पाहिजे. त्यांनी या पत्रात शेक्सपिअरच्या नाटकातील खालील वचन उद्धृत केले होते. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात जेव्हा संधीची लाट येते, तेव्हा तीचा योग्य प्रकारे उपयोग केला तर त्या मनुष्यास वैभव प्राप्त होते.

डॉ. आंबेडकरांनी सांगितलेला हा शोषणमुक्तीचा मार्ग जणू समाजवादी तत्वज्ञानाचेच नवे रुप आहे,[३] यातून मुलांच्या बरोबरीने मुलीनी शिकावे असा त्यांचा प्रयास दिसतो.

बहिष्कृत हितकारीणी सभा आणि स्त्रि शिक्षण

डॉ. आंबेडकरांनी १९२४ साली स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारीणी सभेचे सभासद एकविस वर्षावरील पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही होण्याचा अधिकार दिला होता. यावरुन असे दिसते की, आपल्या चळवळीमध्ये बाबासाहेबांनी स्त्रीवर्गाला जागृत करुन समाविष्ट केले होते. कारण, स्त्रीयांच्या प्रगतीवरुनच समाजाची खरी प्रगती दिसून येते असे त्यांचे मत होते. सन १९२४ साली स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारणी सभेच्या उद्दिष्टात आणि १५ ऑगस्ट १९३६ साली स्थापन केलेल्या स्वतत्र मजूर पक्षासारख्या राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यात सुध्दा शिक्षणावर भर दिलेला दिसतो.

सन १९२६ साली स्थापन केलेल्या समाज समात संघाच्या ध्येय धोरणातच स्त्रीपुरुष समतेचा पुरस्कार केला होता. समाज समता संघाच्या तत्व आणि ध्येयाबाबत बाबासाहेब लिहीतात, "The league betieves that's this right of equality is the birth right of every human bein irrespective of race, creed, caste and sex.[४] शिका संघटीत व्हा व संघर्ष करा!' हा त्यांनी राबविलेला त्रिसुत्री कार्यक्रम फक्त पुरुषांसाठीच होता, असे कसे म्हणता येईल? तो निश्चितच स्त्रियांसाठी ही होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण चळवळीत स्त्री स्वातंत्र्यास प्राधान्य दिले आहे. त्याच बरोबर सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनीही वावरले पाहिजे, असे त्यांचे विचार होते.[५]

स्त्री-पुरुष सहशिक्षणास प्राधान्य

स्त्रियांना शिक्षण द्यावे एवढेच बाबासाहेबांचे मत नव्हते. तर सहशिक्षण द्यावे, असे त्यांचे मत होते. या स्त्री-पुरुष सहशिक्षणाच्या

संदर्भात बाबासाहेबांचे विचार त्यांच्या मुळ उदाहरणासह डॉ. गंगाधर पानतावणे आपल्या पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या पुस्तकात दिलेला आहे. तो मुळ उतारा अभ्यासण्यासारखा आहे. त्यात पानतावणे लिहितात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहशिक्षणाचे पुरस्कर्तें होते.[६]

महाडचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन दिला दिवशी स्त्रियांसमोर बाबासाहेबांनी मांडलेले विचार

१९-२० मार्च, १९२७ साली स्वःहक्कांच्या, समतेच्या लढ्यासाठी महाड येथील चवदार तळयावर पाणी पिण्याच्या पहिला सत्यागृह करुन डॉ.बाबासाहेबांनी आपल्या जनजागृतीच्या कार्याची यशस्वी मुहूर्तमेढ रोवली. डॉ. बाबासाहेबांनी महाड समता संग्रामाच्या वेळी दि.२७/१२/१९२७ रोजी स्त्रियांना उद्देशून जे भाषण केले, त्यात ते स्त्री शिक्षणाचे महत्व विशद करतांना म्हणाले, तुम्ही आपल्या मुलीना शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरुषांसाठीच नाहीत. त्या स्त्रियांनाही आवश्यक आहेत.

तसेच, २० जुलै, १९४२ रोजी नागपूर येथे आयोजित ऑल इंडिया डिस्प्रेस्ड क्लासेस वुमन्स कॉन्फ्रेरन्समध्ये सहभागी झालेल्या २० ते २५ हजारांच्या संख्येने उपस्थित महिलांना उद्देशून भाषण करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, समाजाची प्रगती होण्याची स्त्रियांची प्रगती होणे आवश्यक आहे, म्हणून स्त्रिशिक्षणाकडे पाठ करुन चालणार नाही म्हणून, तुम्ही मुलींना शिक्षण दिल्यावाचून राहू नका. हा स्त्रिशिक्षणाचा सल्ला त्यांनी दिला.[७]

जनतेस मुला-मुलींच्या शिक्षणाविषयी संदेश

१३ जुलै, १९४१ (रविवार) रोजी ३ वाजता मुंबई येथील कावसजी जहांगीर हॉलमध्ये म्युनिसिपल कामगार संघाची वार्षिक सर्वसाधारा सभा झाली. सभेस जवळजवळ दोन ते अडीच हजार म्युनिसिपल कामगार हजर होते. या सभेला संबोधित करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले की, तुम्ही तुमच्या मुलांना व मुलींना शिक्षण देऊन तुम्ही जे काम करता त्यांना त्या कामात पडू न देण्याची खबरदारी घ्या.[८] १० ऑक्टोंबर, १९३२ रोजी सावंतवाडी येथे स्त्रियांच्या सभेत भाषण करतांना बाबासाहेब म्हणाले, कितीही बिकट परिस्थिती असली तरी तुमच्या मुला-मुलींना शाळेत पाठवित जा, स्पृश्य स्त्रियांत व तुमच्यात कोणताही फरक दिसता कामा नये.

आपण एवढी जबाबदारी स्विकारली तरी समाजाच्या उद्दाराकार्यात फरक दिसता कामा नये. आपण, एवढी जबाबदारी स्विकारली तरी समाजाच्या उध्दारकार्यात महत्वाचा भाग घेतल्यासारखे होईल.[९]

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रिमुक्तीच्या चळवळीला गतिमान करण्यासाठी समाजप्रबोधन आणि कायदा या दोन्ही मार्गाचा अवलंब केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याच्या व हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रिमुक्तीसाठी केलेले कार्य ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय महत्वपुर्ण आहे. भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्रियांवर लादलेली हजारो वर्षांपासूनची सामाजिक, आर्थिक गुलामगिरी कायद्याद्वारे नष्ट करण्यात आली. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ ते १८ यामध्ये मुलभूत अधिकार म्हणून समतेचा अधिकार मान्य करण्यात आला.[१०]

महिलांच्या संघटीत शक्तीवर संस्थांवर त्यांचा विश्वास होता आणि संघटीत होण्यासाठी संघटित होऊन समाजातील दुर्गण नष्ट करण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे, ही बाबासाहेबांची स्त्री शिक्षण विषयक भूमिका होती. आपल्या मुला-मुलींना शिकवा देशाचा विकास होईल. तुमच्या अस्मितेची तुम्हीपण माणूस आहात अशी तुम्हाला ओळख होइल, कारण शिक्षण हे वाघणीचे दूध आहे, जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, असे बाबासाहेब सांगत आणि म्हणूनच निम्न मध्यम वर्गामध्ये आणि विशेषतः अनूसूचित जातीमध्ये उच्च शिक्षणाचे प्रचलन करण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी ८ जुलै, १९४५ रोजी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व तिने २० जून, १९४६ रोजी सिध्दार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय सुरु केले आणि भारतातील एक अग्रगण्य महाविद्यालय असल्याचे सिध्द केले.

पी.ई.एस. ची ध्येय उद्दिष्ट जाहिर करतांना बाबासाहेब म्हणाले की, पी.ई.एस. चा हेतू केवळ शिक्षण देण्याचाच नव्हता. परंतू शिक्षण अशा रितीने द्यायचे की, त्यामुळे भारतामध्ये बौध्दिक, सामाजिक आणि नैतिक लोकशाहीचे प्रचलन करता येईल.[११]

आपल्या जीवनकाळामध्ये डॉ. आंबेडकर यांनी १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद कला आणि विज्ञान महाविद्यालय स्थापन केले

व्हा मुलाबरोबर सर्व जातीधर्माच्या मुलींना आपल्या महाविद्यालयात येणे शक्य व्हावे म्हणून बसची सोय केली होती.१० एवढेच नव्हे तर महाविद्यालयाच्या सुरुवातीच्या वर्षी मुलींच्या राहायची सुध्दा तात्पुरती सोय करुन दिली होती. दलित स्त्रीला शिक्षणासाठी प्रेरणा देऊन प्रोत्साहित करण्याचे श्रेय निश्चितच बाबांचे आहे.

मानवी संबंध व्यवस्थेच्या सर्व पातळयांवरील शोषणातून मुक्त होण्याचा उपाय म्हणजे शिक्षण म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात, शोषण मुक्तीची खरी पहाट म्हणजे शिक्षण होय. भारतातील पददलित, स्त्रिया यांच्या दैन्यावरचा रामबाण उपाय म्हणजे शिक्षण होय, अशी त्यांची खात्री पटली होती. म्हणून म्हणाले होते की, सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करुन होण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग होता. या त्यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानात स्त्री-पुरुष समानतेचे बीजे दिसतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचार व कार्यातून स्त्रि शिक्षण विषयक दृष्टीकोन अधिक स्पष्ट होतांना दिसतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक चळवळीतून समाजाच्या विविध क्षेत्रात अनेक प्रतिभावंत स्त्रिया निर्माण झालेल्या दिसतात. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्य आणि विचारांचा स्त्रिमुक्तीशी महत्वाचा संबंध दिसून येतो. महात्मा फुले यांचा स्त्री-शिक्षणाचा वारसाही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे चालविल्याचे दिसते. एकूणच, महात्मा फुले व बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना मोफत शिक्षण दिले पाहिजे, त्यात जात, धर्म, पंथ असा भेदभाव न करता मोफत शिक्षण देण्यात यावे, अशी सातत्याने भूमिका घेतलेली त्यांच्या विचारातून स्पष्ट होते. परंतू, आज जरी विविध क्षेत्रात स्त्रियांनी भरीव कामगिरी करुन आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवून मोठमोठे पदे काबीज केली आहे व सर्व क्षेत्रात महिला यशस्वी होत असल्या तरीही अजूनही स्त्री म्हणून होणारा भेदभाव व अन्याय अत्याचार थांबताना दिसत नाही. अजूनही या देशात स्त्रियांना पुर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणाची मोफत सुविधा उपलब्ध नाही व स्त्रिमुक्ती चळवळ व पुरोगामी चळवळींनीही स्त्रियांना मोफत शिक्षण देण्यात यावे, ही मागणी रेटताना दिसत नाही. एकूणच, या भांडवली व बाजारु व्यवस्थेत शिक्षणाचे खाजगीकरण व बाजारीकरणाची झळ स्त्रि शिक्षणालाही पोहचताना दिसत आहे व याबाबत राज्यकर्तेही उदासिन आहेत. त्यामुळे महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्रिशिक्षण विषयक धोरणाची अंमलबजावणी ही काळाची गरज ठरते.

संदर्भसूची

१) letter of Ambedkar- Surendra Ajnot Page 17, 18 (मुळ पत्र हे परिशिष्टात जोडले आहे.)
२) डॉ.आंबेडकर तत्व आणि विचार, धनजंय कीर
३) डॉ. आंबेडकर गौरवग्रंथ- डॉ. आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टीकोन – प्रा. बा.ह. कल्याणकर पृष्ठ क्र. २२१
४) पवार उर्मिला, मुन मीनाक्षी, आम्हीही इतिहास घडवला, पृ. ८८
५) पवार उर्मिला-मुन मिनाक्षी, आम्ही इतिहास घडवला, पृ. ८८
६) प्रा. साळुंखे, महात्मा फुले गौरव ग्रंथ, संपा. हरी नरके, तृतीय आवृत्ती २००६, पृ. ६०६
७) लोकराज्य, डॉ.बा.आं. विशेषांक, १६ एप्रिल, १९९०, मून मीनाक्षी पृ.५०
८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड २) मून वसंत,नरके हरी, प्रथमावृत्ती २००२, पृ.३७६,३७७)
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, पवार दया प्रा.संदानशिव डी. एन. तृतीयावृत्ती २००६, पृ. ४१७-१८
१०) भगवानबुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, प्रा. मुलजाधव सुशीला, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००६ पृ.८०
११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-२, मुन वसंत, नरके हरी, महाराष्ट्र शासन, २००२ प्रथमावृत्ती, ४२६.